RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ५, अंक ४३] सोमवार, सप्टेंबर १६, २०१९/भाद्र २५, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ६६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**म्हसळा नगरपंचायत, म्हसळा**

मु. पो. ता. म्हसळा, जि. रायगड

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार म्हसळा नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक ५९७ म्हनप/२०१९-२०.—शासनाचे नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक एमयूपी. २०१४/प्र. क्र. २०६/नवि १९, दिनांक २६ जून २०१५ अन्वये म्हसळा नगरपंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये म्हसळा नगरपंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक २३, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) नुसार म्हसळा नगरपंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगरपंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुख्याधिकारी म्हसळा नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करताना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यांत येईल.

**वैभव शरद गारवे,**
मुख्याधिकारी,
म्हसळा नगरपंचायत, म्हसळा.

ठिकाण : म्हसळा,
दिनांक ९ सप्टेंबर २०१९.

**MHASLA NAGARPANCHAYAT, MHASLA**

At. Post. Tal. Mhasla, Dist. Raigad

**Notice**

Declaration of Intention to prepare Development Plan of Mhasla Nagar Panchayat as per section 23(*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1988.

No. 598MNP/2019-20.—Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUP. 2014/PR.KR. 206/NAVI 19, dated 26th June 2015 constituted Mhasla *Nagar Panchayat* as per section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1988 for planned development of the said area.

Hence the Mhasla *Nagar Panchayat* by its resolution No. 23 dated 31st August 2019 has given consent to declare is intention to prepare Development plan. As per provision of section 23(*1*) read with section 21(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development plan of Mhasla *Nagar Panchayat* is kept open for inspection by the public on office working days, during office of the *Nagar panchayat* as required under section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in working to the Chief Officer Mhasla *Nagar Panchayat* within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

VAIBHAV SHARAD GARVE,

Place : Mhasla, Chief Officer,

dated 9th September 2019. Mhasla Nagar Panchayat, Mhasla.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.